# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांचे बनावट आदेशाबाबत**

**(१) २१४४१ (१७-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या जुन्या तारखेचे बनावट आदेश तयार करुन अजूनही बदल्या करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये दलालमार्फत बदल्या करण्याचे कारस्थान मोठ्या प्रमाणात केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हा परिषदेमार्फत चौकशी चालु असून जे शिक्षक दोषी आढळतील त्यांच्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१), (२), (३) व (४) सदर मुद्यांबाबत स्वतंत्रपणे चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना शासन पत्र क्र.विसअ-१३१५/(प्र.क्र.२७५/१५)/आस्था-१४, दिनांक ११/०७/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

---

**लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक गावांमध्ये सार्वजनिक स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) २१५८९ (१४-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक गावांमध्ये सार्वजनिक स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील प्रत्येक गावांमध्ये स्मशानभूमीच्या अडचणीमुळे माणसांवर होणारा शेवटचा संस्कार म्हणजे “अंतिम संस्कार” करण्यात ग्रामीण जागेअभावी अडचणी निर्माण होत असल्यामुळे शासन सार्वजनिक स्मशानभूमीसाठी शासनातर्फे जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(३) असल्यास, माहे मे, २०१५ अखेर किती गावात उपलब्ध केल्या आहेत व अद्यापही किती गावात जागा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे,
(४) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत ज्या गावात दहन/दफनभूमी साठी ग्रामपंचायत किंवा शासनाच्या मालकीची जमीन उपलब्ध नसेल अशा गावांसाठी भूसंपादन करणे व इतर अनुषंगिक बाबींसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(३) लातूर जिल्ह्यामध्ये एकूण ९४७ महसूली गावे असून त्यापैकी सद्यस्थितीत १५१ गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नाही.
(४) व (५) ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नाही अशा गावांचे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्याबाबत गट विकास अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

### अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात झालेला गैरकारभार

**(३) २६२५५ (१७-०९-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात बनावट आंतर जिल्हा बदल्यांद्वारे सुमारे १७५ शिक्षक रुजू झाल्याचा प्रकार चौकशीअंती निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) उक्त बदली प्रकरणे तयार करतांना बनावट कागद पत्रांचा वापर वा आधार घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(३) उक्त आंतर जिल्हा बदली संबंधाने रुजु होण्यासंबंधाने आलेल्या शिक्षिका विरुध्द गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुख्याधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गैरप्रकार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१), (२), (३), (४) व (५) जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत आंतरजिल्हा बदली मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत तत्कालीन उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली होती. या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांविरूध्द कारवाई करण्यास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना दि.२-६-२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

### अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील संरक्षक भिंत निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(४) २८३५८ (२०-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे बाजारपुलाजवळ नदीला बांधलेल्या दोन संरक्षक भिंतींची कामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंजनवेल ग्रामपंचायतीने स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक करूनही बहुतांश कामे निकृष्ट दर्जाची झाल्याची तक्रार रहिवाशांची आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निकृष्ट कामांबाबत चौकशी होऊन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :** (१) नाही.
(२) ग्रामस्थ, ग्रामपंचायत, अंजनवेल यांनी दिनांक १३/०१/२०१४ रोजी तक्रार केली हे खरे आहे.
(३) मौजे अंजनवेल येथे बाजारपुलाजवळील नदीला बांधलेल्या दोन संरक्षक भिंतीचे काम हे कायवाटपसमिती, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वाटप करण्यात आल्यानुसार ग्रामपंचायतीकडून त्यांना दिनांक ०१/११२०१३ रोजी काम सुरु करण्याचे आदेश दिले होते. सदर कामाबाबत प्राप्त तक्रारीस / अनुसरुन सरपंच, ग्रामपंचायत, अंजनवेल यांनी दिनांक १७/१/२०१४ रोजी संबंधित तक्रादार यांची बैठक आयोजित करुन, त्यांचे म्हणणे ऐकूण घेऊन, सदर कामाबाबतची माहिती व खुलासा तक्रादार यांना केला. त्याबाबत तक्रारदार यांचे समाधान झालेले आहे. तसेच सदर संरक्षक भिंतीचे काम सुस्थितीत असल्याबाबतचा अहवाला उप अभियंता, जिल्हा परिषद, उपविभाग इमारती, मुख्यालय गुहागर यांनी दिलेला आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पनवेल (जि. रायगड) तालुक्यातील पळस्पे गाव आणि डेरवली या गावांना जोडणारा पूल कोसळल्याबाबत

**(५) २८७०६ (२२-१२-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील पळस्पे गाव आणि डेरवली या गावांना जोडणारा पूल दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोसळला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा पूल कोसळण्याची कारणे काय आहेत, याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच या दोन गावांचा संपर्क होण्याकरिता कोणती तात्पुरत्या स्वरुपाची सोय करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरचा पूल हा सुमारे ३५ ते ४० वर्षे जुना आहे. या पुलाला ४ गाळे असून पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे नदीचा प्रवाह वाढल्यामुळे एका गाळ्यावरील स्लॅब कोसळला आहे.
(३) सदरचा पूल हा जुना असल्याने तसेच पुलाचा स्लॅब कमकुवत असल्याने पडला आहे. दोन गावांचा संपर्क सुरु राहण्यासाठी कोसळलेल्या एका गाळ्यावर लोखंडी साकव बांधून तात्पुरत्या स्वरुपाची ये-जा करण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

आता सदर साकवाचे काम जिल्हा नियोजन समितीमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा) येथील इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेचे प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याबाबत**

**(६) २९१७३ (२०-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि. बुलढाणा) येथील इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेचे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव तत्काळ निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) प्रस्ताव प्रलंबित नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील वडगाव बदूड येथे मुठा नदीपात्रालगत इमारत बांधकामांना मान्यता देण्याबाबत**

**(७) २९२४९ (२२-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील वडगाव बदूड येथे मुठा नदीपात्रालगत इमारत बांधायची परवानगी देणा-या खडकवासला पाटबंधारे विभागानेच २०१० ते २०१२ या कालावधीत पाच विकासकांना बांधकामासाठी दिलेले ना हरकत आणि पूर रेषा नकाशे ग्राह्य धरु नये असे पत्र पाटबंधारे विभागाने महापालिकेला दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभागाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार महापालिकेने या पाच विकासकांना परवानगी दिली असून त्या ठिकाणी इमारती ही उभ्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित बांधकामांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१६) :** (१), (२) व (३) जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यकारी अभियंता व क्षेत्रिय शाखा अभियंता स्तरावरुन ५ विकासकांना सन २०१० ते २०१२ या दरम्यान ना-हरकत पत्र देण्यात आले होते. मात्र पुराचा संभाव्य धोका टाळण्याच्या दृष्टीकोनातून शासन परिपत्रक दि. ०२.०३.२०१५ अन्वये पूररेषा व पूरक्षेत्र निश्चित करण्याचे आधिकार विभागाच्या क्षेत्रिय मुख्य अभियंत्यांना देण्यात आल्यामुळे पूर्वी निम्न स्तरीय अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्र ग्राह्य धरणात येऊ नये व ते रद्द बादल करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेला संबंधित क्षेत्रीय कार्यकारी अभियंता यांनी पत्राद्वारे कळविले, अशी वुस्तस्थिती आहे. जलसंपदा विभागाकडून पूर्वी निम्न स्तरीय अधिकाऱ्यांमार्फत देण्यात आलेल्या ५ ना-हरकत प्रमाणपत्रानुसार पुणे महानगरपालिकेकडून केवळ एका विकासकाला बांधकाम परवानगी देण्यात आली होती व त्यानुसार बांधकाम झालेले आहे. हे बांधकाम नदीच्या निषेधक पूररेषेच्या बाहेर असल्याचे क्षेत्रिय पाहणीनुसार आढळून आलेले आहे. उर्वरित चार बांधकामांचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय योग्य असल्यामुळे त्यांना बांधकामाची मान्यता देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रोहा (जि.रायगड) तालुक्यातील भालगाव येथे घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(८) ३०४३३ (१६-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील भालगाव येथे घरकुल गैरव्यवहार प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, सदर घरकुल गैरव्यवहार प्रकरणी सुरु असलेल्या चौकशीमध्ये विलंब होत असल्याबाबत ग्रामस्थांनी संशय व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार उक्त घरकुल गैरव्यवहारामध्ये दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर चौकशीमध्ये कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचे दिसून आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील नविन विश्रामगृह ते सावदा स्टेशन रोड या रस्त्याची निधी अभावी झालेली दुरवस्था**

**(९) ३६०७९ (२२-१२-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील नविन विश्रामगृह ते सावदा स्टेशन रोड या रस्त्यावर मोठया प्रमाणात रहदारी वाढल्यामुळे तसेच निधी अभावी सदर रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार जळगाव जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८३३६.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ८३३०.०५ कि.मी. इतकी आहे.

रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जळगाव जिल्हा परिषदेस एकूण रु. २६२०.३१ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३ ते २०१४-१५ मध्ये एकूण रु. ९८४.९९ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी जळगाव जिल्हा परिषदेला रु. ५७४.४० लक्ष असा एकूण रु. ४१७९.७० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

प्रश्नाकित रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पहाणी करण्यात आली असून या रस्त्याची किरकोळ दुरुस्ती करुन वाहतूकीस योग्य रस्ता करण्यात आलेला आहे. सदर रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषास अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**परभणी येथील जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे लेखापरिक्षण केले असता अनियमितता आढळून आल्याबाबत**

**(१०) ३८३९३ (२०-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद परभणीचे सन २००८-२००९ मध्ये लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखा परिक्षणातून गंभीर बाबी समोर आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०२-२०१६) :** (१) होय.

(२) नाही, केवळ आरोग्य विभाग जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र दैठणा येथील वाह्यरुग्ण शुल्क उशिरा भरणा केले बाबत अनियमितता होती.

(३) आरेग्य विभाग जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमि आरोग्य केंद्र, दैठणा येथील बाह्यरुग्ण फी रु.२८,९९६/- जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीत भरणा केली असून संबंधिता कडून व्याजाची रक्कम वसूलीबाबत तसेच संबंधितावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय सेवेतील रिक्त जागा न भरल्यास तसेच कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ नेमण्याचे धोरणाबाबत**

**(११) ३९७६७ (१७-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शासकीय सेवेतील रिक्त जागा न भरल्यास तसेच कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ नेमण्याचे धोरण रद्द न केल्यास त्याचा प्रशासनाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होईल अशा आशयाचे पत्र महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघाने दि.१६ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०१६) :** (१) होय, अशा आशयाचे पत्र महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाकडून प्राप्त झाले आहे.
(२) वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या दृष्टीने नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती यावर नियंत्रण आणण्याचा निर्णय वित्त विभागाच्या दि.०२/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये पदभरतीवर काही प्रमाणात निर्बंध घालण्यात आले आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ (ब) व (क) मध्ये नमूद पदांव्यतिरिक्त उर्वरित पदे भरण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. शासन निर्णय दि.२३/०९/२०१५, दि.१७/११/२०१५ व दि.१५/०१/२०१६ नुसार उपरोक्त दि.०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली असून महसूली उत्पन्न वाढवून देणाऱ्या काही विभागांना तसेच अत्यावश्यक सेवा म्हणून शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्स तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापक वर्ग व रुग्णसेवेशी संबंधित कर्मचारी यांना या निर्बंधातून वगळण्यात आले आहे.

मनुष्यबळाचे कायम दायित्व निर्माण न करता, प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शक्य असेल तेथे नवीन पदनिर्मिती न करता सहजरीत्या जी कामे बाह्ययंत्रणेकडून करुन घेता येतील अशी कामे बाह्ययंत्रणेकडून करुन घेण्याच्या सूचना वित्त विभागाच्या दि.२७/०९/२०१० च्या शासन निर्णयान्वये प्रशसकीय विभागांना देण्यात आल्या आहेत. तथापि, प्रकरणपरत्वे आवश्यकतेनुसार नियमित पदनिर्मितीही केली जाते. एकंदरीत नियमित पध्दतीने कर्मचारी घेण्याच्या तुलनेत बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्याचे प्रमाण अल्प आहे.

सबब महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने दि.१६/०१/२०१६ च्या निवेदनान्वये सर्व मंजूर पदे भरण्याचे व कंत्राटी पध्दतीऐवजी नियमित नियुक्त्या देण्याची आग्रही मागणी केली असली तरीही उपरोक्त वस्तुस्थिती व वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या दृष्टीने संघटनेची मागणी मान्य करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"नरेगा" राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजूरांच्या मजुरीत वाढ करण्याबाबत**

**(१२) ३९८३० (०४-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) "नरेगा" राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजुरांना प्रतिदिन सुमारे १६५ रुपये मंजुरी मिळत असल्याने या कमी मजुरीने मजुरांनी या योजनेकडे दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयात कमी मजुरीमुळे कामगार नरेगाच्या कामावर येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, “नरेगा” वरील मजूरी दरात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१४-१५ या वर्षामध्ये मजूरांच्या मजुरीचा दर प्रतिदिन रु. १६८/- इतका होता. आता त्यामध्ये वाढ होऊन सन २०१६-१७ या वर्षाकरिता रु. १९२/- प्रतिदिन इतका मजुरी दर लागू करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासन प्रत्येक वर्षी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या मजूरीचा दर निश्चित करते. त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक २३ मार्च, २०१६ च्या अधिसूचनेन्वये सन २०१६-१७ या वर्षाकरिता महाराष्ट्रासाठी रु. १९२/- प्रतिदिन इतका मजूरी दर निश्चित केला आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय दिनांक ०१ एप्रिल, २०१६ अन्वये राज्यात रु. १९२/- प्रतिदिन इतका मजूरी दर लागू करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयातील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(१३) ३९८७७ (०४-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या मागील १५ वर्षापूर्वी धरणे बांधण्यासाठी जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या त्या जमीनीचा मोबदला त्यांना दिला गेलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी जवळपास २० हजार शेतकरी दाद मागण्याकरीता न्यायालयात गेले परंतु आर्थिकदृष्टया गरीब असलेले शेतकरी न्यायालयात गेले नसल्याने या संपूर्ण मोबदल्यापोटी सद्या शासनाला ३२२ कोटी ४३ लक्ष रू. देणे आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास,शेतकऱ्यांना मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
भू-संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार मोबदला अदा करण्यात येईल.
(२) नाही.

भूसंपादनाचा निवाडा जाहीर झालेल्या निधीची अदायगी निधी उपलब्धतेनुसार करण्यात येईल. भूसंपादन कायदा १८९४ मधील कलम १८/२८ अंतर्गत वाढीव मोबदला मिळणेसाठी मराठवाड्यातील १५४५९ शेतकरी न्यायालयात गेलेले आहेत व भूसंपादनापोटी रु.६५८.१४ कोटी दायित्व निर्माण झालेले आहे.
(३) न्यायालयाच्या निर्णयानुसार व निधी उपलब्धतेनुसार मावेजा अदा करण्याची योग्य कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील सुमारे ५५० शिक्षकांच्या जिल्हा बदलीच्या प्रस्तावाबाबत**

**(१४) ३९८९८ (२५-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात प्राथमिक शिक्षक म्हणून भरती झालेल्या बाहेरील जिल्हयातील सुमारे ५५० शिक्षकांनी तीन ते पाच वर्षांच्या सेवेनंतर जिल्हा बदलीसाठी प्रस्ताव सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील मंडणगड, राजापूर, खेड, दापोली, रत्नागिरी या तालुक्यांमध्ये उपशिक्षक पदाच्या अनेक जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१५ मध्ये काही शिक्षकांनी पती-पत्नी एकत्रित या शासनाच्या अटीचा लाभ घेण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करून जिल्हा बदली मिळविण्याचा प्रयत्न केला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. रत्नागिरी जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये २२९ प्राथमिक शिक्षकांचे आंतर जिल्हा बदलीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रीक हजेरी प्रणाली बसविण्याबाबत**

**(१५) ४१५८२ (०५-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील काही ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रीक हजेरी प्रणाली प्रायोगीक तत्वावर सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे निष्कर्ष काय आलेत तसेच शासन जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ही बायोमेट्रिक हजेरी प्रणाली सुरु करणार आहे काय,
(३) असल्यास, किती दिवसामध्ये याची कार्यवाही पूर्ण होणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) खरे आहे,
(२) व (३) सांगली जिल्ह्यातील एकूण ६९९ ग्रामपंचायतींपैकी २६३ ग्रामपंचायतींमध्ये बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली बसविण्यात आली आहे. तथापि राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली बसविण्याबाबत शासनाकडून कोणतेही आदेश देण्यात आलेले नाहीत.

---

**लवादाच्या निर्णयाचा फेरविचार करण्याकरीता राष्ट्रीय लवादाकडे प्रस्ताव दाखल करण्याबाबत**

**(१६) ४४२६१ (२५-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राचे भौगोलिक गोदावरी खोऱ्याचे क्षेत्र ४९ टक्के असतांना प्रत्यक्षात पाणी वाटप ३१ टक्के हिस्सा देण्यात आला तर, आंध्रप्रदेशचे २३ टक्के भौगोलिक क्षेत्र असतांना पाणी वाटपाचा ३० टक्के हिस्सा देवून यामध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत आंध्र राज्यास दुप्पट पाणी देवून १९८० साली राष्ट्रीय लवादाने दिलेल्या निर्णयामुळे, महाराष्ट्रावर अन्याय केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लवादाच्या निर्णयामुळे महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश राज्यास पोचमवाड धरणातून सद्य:स्थितीत किती घनफुट पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर पाणी वाटपात महाराष्ट्रावर अन्याय झाला असल्यामुळे सदर निर्णयाचा फेरविचार करण्याकरीता, शासनाने, राष्ट्रीय लवादाकडे प्रस्ताव दाखल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१६) :** (१) गोदावरी खोऱ्यातील उपलब्ध जलसंपत्तीचा शास्त्रशुध्द अंदाज करुन सर्व राज्यामध्ये न्याय वाटप करण्याच्या दृष्टीने १०.०४.१९६९ रोजी सर्व संमत्तीने गोदावरी पाणी तंटा लवादा केंद्र शासनाच्या अधिसूचनेनूसार अस्तित्वात आला. गोदावरी पाणी तंटा लवादाने महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश व ओरिसा राज्यांच्या परस्परातील करारनाम्यांना प्रमाण मानून महाराष्ट्रातील संबंधित उपखोऱ्यात महाराष्ट्र राज्याचे पाणी वापराचे अधिकार निश्चित केले व त्याचा अंतर्भाव लवादाच्या दि.०७/०७/१९७९ रोजी जाहिर केलेल्या निवाड्यात केलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रावर अन्याय झाला असे म्हणता येणार नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विविध विभागातील रिक्त पदे व नवीन पदे भरण्यावर**
**निर्बंध टाकण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(१७) ४४३४४ (१७-०५-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शिक्षक, पोलीस, ग्रामसेवक, तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पाटबंधारे कनिष्ठ अभियंता इत्यादी संवर्गातील रिक्त पदे व नवीन पदे भरण्यावर निर्बंध टाकण्याचा निर्णय घेतला असून यामधून सिडको, मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), पिंपरी चिंचवड विकास प्राधिकरण, नागपूर सुधार न्यास या स्वायत्त संस्थांना वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या दि. ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयान्वये नवीन पदनिर्मितीवर निर्बंध घालण्यात आला आहे. मात्र हे बंधन सिडको, MMRDA,PMRDA,NIT,NMRCL,MMRCL,PMRCL यासारख्या आर्थिक सक्षम स्वायत्त संस्थांना तसेच केंद्र शासन पुरस्कृत (ज्या आस्थापनांचे पगार केंद्र शासनाच्या अनुदानातून होतात) संस्थांना लागू नाहीत.

तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ (क) मध्ये नमूद केलेल्या शिक्षक, पोलीस कॉन्स्टेबल, ग्राम सेवक, तलाठी, आरोग्य परिचारीका, पशुधन परीवेक्षक, मत्स्य व्यवसाय विभागाचे तालुका स्तरावरील अधिकारी, वन रक्षक, कृषी सहायक, पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता या सवंर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ७५ टक्के पर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आली होती. त्यामध्ये दि. १५/०१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून आता उपरोक्त संवर्गातील एकूण रिक्त पदापैकी ५० टक्के पर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे.

(२) दिर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतन वाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या सरासरी दरापेक्षा अधिक असता कामा नये, हे सर्वसामान्य तत्व पाळणे आवश्यक आहे. तसेच दि. ०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाच्या अपेक्षित शिफारशीमुळे वेतनावरील खर्चात मोठी वाढ संभवते, या सर्व बाबींचा विचार करुन वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या दृष्टीने शासनाने सदर निर्बंध घातले आहेत. तथापि, ज्या विभागातील पदनिर्मिती/पदभरतीमुळे राज्याचे महसुली उत्पन्न वाढणार आहे त्या विभागांना तसेच अत्यावश्यक सेवा म्हणून शासकीय रुग्णालयामधील डॉक्टर्स तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील अध्यापक वर्ग यांना सदर पदनिर्मिती/पदभरतीचे निर्बंधमधून वगळण्यात आले आहे.

(३) उपरोक्त शासन निर्णयामुळे नवीन पदनिर्मिती तसेच पदभरतीवर नियंत्रण आणण्यात आले आहे. तसेच, वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याद्दष्टीने उपरोक्त शसन निर्णयाचे पालन राज्य शासनाच्या विविध विभागांकडून करण्यात येत आहे.

---

**अकोला शहरातील रिंगरोड ठरणाऱ्या कॅनॉल मार्गाचे काम अकोला पाटबंधारे विभागाच्या धोरणामुळे प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ४४७५२ (२१-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील रिंगरोड ठरणाऱ्या कॅनॉल मार्गाचे काम अकोला पाटबंधारे विभागाच्या अडवणूकीच्या धोरणामुळे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९८० नंतर शहराचे विस्तारीकरण झाल्यावर सन १९९२ पासून सदर कालवा बंद पडला व ह्या दुर्लक्षित जागाचे बाजारभावानुसार मुल्य पाटबंधारे विभाग मनपा अकोला यांना मागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मनपाने सदर रक्कम दिली नसल्यामुळे शहराची विकास कामे करण्यास अडचणी येत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबास कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) नाही.
(२) होय.
(३) जमिनीचे बाजार भावाने येणारे मुल्य मिळण्याची जलसंपदा विभागची मागणी नियमानुसार असल्याने मनपा अकोला मार्फत पूर्तता होणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भेंडाळा मध्यम सिंचन प्रकल्पात (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) मोडणाऱ्या बेरडी (जुनी) व बेरडी (नवीन) या दोन गावांचे पुनवर्सन करण्याबाबत**

**(१९) ४५२१८ (०३-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भेंडाळा मध्यम सिंचन प्रकल्पावर (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत ३७९१.४१ लक्ष खर्च झाला असून १५ वर्षाचा कालावधी लोटुन सुध्दा प्रकल्पात मोडणाऱ्या बेरडी (जुनी) व बेरडी (नवीन) या दोन गावांचे पुनवर्सन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी परिसरातील बेरडी (जुनी) बेरडी (नवीन) सोनुर्ली, भेंडाळा, सिर्सी, चिचबोडी आणि टेंभुरवाही या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी अत्यल्प मोबदल्यात अधिग्रहीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, बेरडी (जुनी) व बेरडी (नविन) या दोन गावांचे पुनवर्सन व सोनुर्ली, भेंडाळा, सिर्सी, चिचबोडी आणि टेंभुरवाही या गावातील शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :** (१) होय.
(२) नाही. १२०.८९ हे.आर. जमीन जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी ठरवून दिलेल्या दराने सरळ खरेदीने अधिग्रहीत केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सोनुर्ली, भेंडाळा, सिर्सी, चिचबोडी, आणी टेंभुरवाही ही गावे पेसा-२०१० मध्ये अंतर्भूत असल्यामुळे ग्रामसभेच्या मंजूरीनेच भुसंपादन व पुनर्वसन प्रक्रिया पुर्ण करावी लागते. त्याप्रमाणे सिर्सी, भेंडाळा या गांवाचे ग्रामसभा ठराव प्राप्त झाले आहेत. परंतु सोनुर्ली येथील शेतकऱ्यांनी नकारात्मक ठराव दिलेल असून, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी ग्रामसभेच्या फेरविचारार्थ पाठविला आहे. सोनुर्ली गावाचा सहमती बाबत निर्णय झाल्यानंतर प्रकल्पाची भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रिया सुरु करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लघुवितरिका शासनाच्या सुधारित नियमाप्रमाणे अंदाजपत्रकास मंजूरी देऊन प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत

**(२०) ४५३५१ (३०-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन योजनेच्या खानापूर-तासगांव कालव्यावरील लघुवितरिका क्र १३/२६० व लघुवितरिकेचे काम मंजूर होवून पुन्हा शासनाच्या सुधारित आदेशानुसार रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लघुवितरिका शासनाच्या सुधारित नियमाप्रमाणे पुन्हा अंदाजपत्रक तयार करुन महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अंदाजपत्रकास तात्काळ मंजूरी देऊन प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :** (१) होय.
शासनाचे आदेश दि. २/१२/२०१४ नुसार कामाच्या निविदा निश्चित करताना पूर्व अर्हताऐवजी पश्चात अर्हता पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक ठरल्याने सदर निविदा रद्द करणेत आली आहे.

(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सदर कामाचे प्रचलित दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे. लघुवितरिकेची भूसंपादन कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेच्या ४ था व ५ वा टप्पा कार्यान्वित करण्याबाबत**

**(२१) ४५३५५ (२९-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेच्या ४ था व ५ वा टप्पा कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास विलंब झाल्यामुळे उपरोक्त गावात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावाना तात्काळ पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :** (१) नाही.
(२) व (३) होय.
टेंभू उपसा सिंचन योजनेच्या टप्पा ४ था व ५ वा टप्याची उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच नियोजनेकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रुपये ८०.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.
टेंभू प्रकल्पाच्या टप्पा क्र.४ व टप्पा ५ अंतर्गत लाभक्षेत्रामध्ये येणाऱ्या गावांपैकी गार्डी, करंजे, वाळूज, जोंधळखिंडी व भांबर्डे या गावांना टँकरने पिण्यासाठी पाणी पुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री तालुक्यातील जामखेडी धरणाच्या डावा कालव्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२२) ४५५०९ (३०-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री तालुक्यातील जामखेडी धरणाच्या डावा कालव्याचे काम ६ कि.मी लांबीपर्यत झाल्यामुळे धरणाचे पाणी तिथपर्यतच जाते, प्रोजेक्ट अहवालाप्रमाणे कॅनलचे काम पूर्ण व्हावे अशी मागणी वारंवार करुन त्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॅनालवरील चारी क्र. ८ ते पुढील चाऱ्या दुरुस्ती न झाल्यामुळे कॅनालचे पाणी संबंधितांना वापरता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :**(१) नाही.

जामखेडी प्रकल्पांतर्गत १८ कि.मी. लांबीचा डावा कालवा असून कालव्याचे काम पूर्ण झाले आहे. कालव्याच्या पुच्छ भागापर्यंत वहन चाचणी घेण्यात आली आहे.

(२) कालव्याचे काम पूर्ण झाले असून, वितरीकांची कामे बाकी असल्याने पूर्ण लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.

(३) वितरण व्यवस्थेची अपुर्ण कामे पूर्ण करणेसाठी रु. ५६.४३ कोटी किमतीचा सुधारित प्रकल्प अहवाल तयार करणेत आला आहे. सदर अहवालास मान्यता देणेची प्रक्रिया शासन स्तरावर प्रगतीत आहे. सदर प्रकल्पास सुप्रमा देऊन कामे मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावावर वित्त विभागाने शेरे घेतले आहेत. पुर्ततेचे काम प्रगतीत आहे.

---

## रामटेक (जि.नागपूर) येथील खिंडसी पुरक कालव्याद्वारे रामसागर जलाशयात सुर नदीद्वारे पेंच प्रकल्पातील अतिरिक्त पाणी सोडण्याबाबत

**(२३) ४५५५२ (२१-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथील खिंडसी पुरक कालव्याद्वारे रामसागर जलाशयात सुर नदीद्वारे पेंच प्रकल्पातील अतिरिक्त पाणी सोडण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१६) :** (१) नाही.

पेंच प्रकल्पाचे पाणी खिंडशी (रामसागर) जलाशयात सोडता यावे यासाठी खिंडशी पुरक कालव्याचे काम प्रगतीत आहे. सुर नदीला पाझर असलेने पुरक कालव्याचेनंतरचे २ किमी भागस योग्य उपाययोजना करावी अशा सूचना श्री.डी.एम.रेड्डी, वि.स.स. यांनी केल्या आहेत. पाणी सोडण्याची मागणी केलेली नाही.

(२) सूचनाबाबत क्षेत्रिय स्तरावर आवश्यक अभ्यास करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्याची जीवनदायी असलेला राजापूर बंधारा कमकुवत झाला असल्याबाबत

**(२४) ४६२६९ (२९-०४-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्याची जीवनदायी असलेला राजापूर बंधारा कमकुवत झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या दुरुस्तीकरिता शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-१०-२०१६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. सदरच्या बंधाऱ्याचे बांधकाम १९८० साली झालेले आहे. बंधारा दगडी बांधकामातील असून, प्रस्तंभातील काही दगड निखळल्याने पाण्याची गळती होते. सध्या या बंधाऱ्याची दुरुस्ती चालू असून ६५ गाळयांपैकी १ ते २२ गाळ्यांमधील दुरुस्ती कामे प्रगतीत आहेत. बंधाऱ्याच्या उर्वरीत दुरुस्तीची कामे “विशेष दुरुस्ती” अंतर्गत करण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील पोथरा लोअर वर्धा, बावनथडी, इटियाडोह, काटेपूर्णा, नळगंगा आणि पेनटाकळी या मोठ्या प्रकल्पांमध्ये २५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याबाबत

**(२५) ४६४२२ (२५-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील पोथरा लोअर वर्धा, बावनथडी, इटियाडोह, काटेपूर्णा, नळगंगा आणि पेनटाकळी या मोठ्या प्रकल्पांमध्ये फक्त २५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील ११ प्रकल्पांपैकी १० प्रकल्पातील जलसाठा हा ३८ टक्क्यांपेक्षा कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी, उद्योगासाठी पाणी आणि नागरीकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

२८ जानेवारी, २०१६ रोजी पोथरा, लोअर वर्धा, बावनथडी, इडियाडोह, काटेपुर्णा, नळगंगा आणि पेनटाकळी या मोठ्या प्रकल्पांमध्ये अनुक्रमे १२, २५, १४, १९, १८, १५ आणि १५ टक्के उपयुक्त पाणी साठा उपलब्ध होता.

(२) होय.

(३) महसूल विभाग - मदत व पुनर्वसन यांच्या दि. ०७.०९.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलाशयातील उपलब्ध पाणीसाठ्यापैकी पिण्यासाठी आवश्यक पाण्याचे आरक्षण करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना दिलेले असून त्यानुसार पाणी पिण्यासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. आरक्षीत पाण्याव्यतिरिक्त उपलब्ध असलेल्या पाण्यातून सिंचनासाठी व औद्योगिक वापरासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राफापुर (ता.तळोदा, जि.नंदुरबार) तालुक्यातील राफापुर येथील लघुपाटबंधा-याच्या उर्वरित कामांबाबत**

**(२६) ४६७२४ (०६-०५-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राफापुर (ता.तळोदा, जि.नंदुरबार) येथील लघुपाटबंधाऱ्याच्या (धरण) द्वितीय सुप्रमाला शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी वितरित केला आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाची उर्वरित कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रकल्पावर मंजूर प्रकल्प अहवालापेक्षा जास्त खर्च झाल्याने प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी व्दितीय सुधारीत प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता बाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामखेडा, भऊर येथे कोल्हापूरी बंधारे बांधण्याबाबते**

**(२७) ४६९३९ (२८-०४-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे दरवर्षी पावसाचे प्रमाण कमी होत असल्याने गिरणा नदी कोरडी पडली आहे त्यामुळे नदीकाठावरील गावांना शेती व पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे, म्हणून खामखेडा भऊर मार्गावरील नदीपात्रात कोल्हापूरी बंधारे उभारण्यात यावेत अशी येथील नागरिकांची मागणी असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांच्या या मागणीवर खामखेडा, भऊर येथे कोल्हापूर बंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :** (१) होय.
(२) शासन पत्र क्र. बीकेएस/२०११(२९/११)/सिंव्य/धोरण, दि. ३०/४/२०११ अनुसार "धरण ते उन्नेयी बंधारा दरम्यान कोल्हापूर पध्दतीचे, सिमेंट प्लग बंधारे घेतल्यास सिंचनावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. म्हणून धरण ते उन्नैयी बंधारा या अंतरात कोणत्याही प्रकारचे बंधारे घेता येत नाहीत. त्यामुळे सदर मागणी मान्य करता येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खुजगाव (ता.शिराळा, जि.सांगली) येथील जलसेतूला लागलेली गळती

**(२८) ४८३४० (३०-०४-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदोली धरणाच्या कालव्याच्या खुजगाव (ता.शिराळा, जि.सांगली) येथील जलसेतूला मागील बराच काळ गळती लागली असून त्यामुळे रोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालव्याचे पाणी बंद करुन जलसेतूची गळती थांबविण्याची कायमस्वरुपी उपाययोजना करण्याकरिता स्थानिक शेतकरी व वाहनचालकांकडून पाटबंधारे विभागाकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे. कालानुरुप सदर जलसेतूचे काही एक्सपान्शन जोडातील रबर खराब झालयामुळे अल्प प्रमाणात पाण्याची गळती होत होती. तथापि माहे फेब्रवारी, २०१६ मध्ये तात्पुरती उपाययोजना करुन गळती थांबविण्यात आली आहे.
(२) होय.

(३) व (४) सदर जलसेतुची दुरुस्ती कामासह, वारणा उजवा कालवा कि.मी. १ ते १२ मध्ये जिओसिंथेटीक अस्तरीकरण उपाययोजना करणेच्या कामाची निविदा निश्चीत करण्यात आलेली असून दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील हरणबारी उजव्या कालव्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) ४९४९४ (२८-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण तालुक्यातील (जि.नाशिक) हरणबारी उजव्या कालव्याचे मौ. पारनेर ते मौ. सतमाने हे २४ ते ४८ कि.मी चे काम अनेक वर्षापासुन प्रलंबित असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा तथा पालकमंत्री, नाशिक यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१६) :** (१) होय.

(२) उक्त प्रश्नात नमूद केलेल्या मागणीकरिता हरणबारी प्रकल्पाच्या जलनियोजनात अतिरिक्त पाण्याची तरतूद नसल्याने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सर्वेक्षणाचे काम हाती घेता येत नाही. तसेच उक्त प्रस्ताव अव्यवहार्य असल्याने शासनाने दिनांक १५/२/२००७ च्या पत्रान्वये अमान्य केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(३०) ५०१५८ (३०-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीला दोन महिन्यापूर्वीच रंगरंगोटी केल्यानंतर पुन्हा त्याच कामासाठी २५ लाखांची तरतुद केली असून काही ठिकाणी गरज नसतांनाही निधी देण्याचे निर्देश देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोसेखुर्द धरणाचे (जि.चंद्रपूर) पाणी उजव्या कालव्यातून मामा तलावात टाकल्यामुळे अनेकांच्या शेतात पाणी साचल्याने पिकांचे नुकसान झाल्याबाबत**

**(३१) ५०१८७ (३०-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसेखुर्द धरणाचे (जि.चंद्रपूर) पाणी उजव्या कालव्यातून मामा तलावात टाकून ओव्हरवेट आसोला मेंढा तलावात टाकण्यात आल्याने मामा तलावाखाली अनेकांच्या शेतात पाणी साचल्याने धानाच्या पिकांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०७-२०१६) :** (१) होय.
(२) महसूल यंत्रणेच्या सर्व्हेक्षणानुसार एकूण ४.३० हेक्टर्स क्षेत्रातील उभ्या पिकांच्या नुकसान भरपाईच्या प्रस्तावाची तपासणी करुन नियमानुसार देय मोबदला अदायगीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील कडवा कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३२) ५०२४७ (३०-०४-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील कडवा कालव्याला माहे जानेवारी, २०१६ मध्ये मोठया प्रमाणात गळती होवून शेतकऱ्यांच्या शेत जमीनी नापीक झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने शेतकऱ्यांना कोणते अर्थसहाय्य केले आहे तसेच कडवा कालव्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) नाही. कडवा कालव्यास काही प्रमाणात गळती झालेली आहे. तथापि, शेतजमिन नापिक झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

कडवा उजवा कालव्याची आधुनिकीकरणाची कामे प्रगतीत आहेत. या कामासाठी मंजूर तृतीय सुप्रमा अहवालात रुपये ६५.१२ कोटी तरतूद आहे. त्यापौकी रुपये ४०.३७ कोटी आधुनिकीकरणावर खर्च झाले आहेत. सन २०१६-१७ मध्ये तरतूद नाही. तथापि, सन २०१५-१६ मधील उर्वरित निधी रु. १६.१९ कोटी शिल्लक आहे. या उपलब्ध निधीतून कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी डावा व उजव्या कालव्याची दुरुस्तीची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) ५०६०४ (३०-०४-२०१६). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी डावा व उजव्या कालव्याची दुरुस्तीचे कामे अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०७-२०१६) :** (१) (२) व (३)
गोदावरी डावा व उजव्या कालव्याची दुरुस्तीचे कामे प्रगतीत असून निधीच्या उपलब्धप्रमाणे सदरची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**चास कमान धरणाकरिता बुडीत क्षेत्रातील वापराविना पडून असलेल्या जमिनी मूळ मालकांना परत मिळण्याबाबत**

**(३४) ५०८१७ (०६-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान धरणाकरिता बुडीत क्षेत्रातील १९७२ साली संपादित केलेल्या परंतु धरणात न बुडालेल्या शिल्लक जमिनी वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चास कमान धरणाकरिता बुडीत क्षेत्रात आवश्यकतेपेक्षा जास्त जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुकडी प्रकल्पाअंतर्गत येडगाव (ता.जुन्नर,जि.पुणे) येथील धरण प्रकल्प ग्रस्तांना जिल्हाधिकारी यांनी आदेश क्र. पमफ/८४/४/८९ दि.३/२/१९८९ अन्वये संपादित करण्यात आलेल्या परंतु पाण्यात न बुडालेल्या जमिनी मूळ मालकांना परत करण्यात आल्या आहे काय,
(४) असल्यास, वापराविना पडून असलेल्या जमिनी मूळ मालकांना परत मिळण्याबाबत लोकप्रतीनिधीनी दिनांक ०९ एप्रिल,२०१५ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल व पुनर्वसन मंत्री यांसकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने जमिनी मुळ मालकांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) नाही,

चासकमान प्रकल्पाकरिता बुडीत क्षेत्रात न घेतलेल्या जमिनी वापराविना पडून असल्याचे व अतिरिक्त जमिनी संपादित केल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) नाही.
(३) जिल्हाधिकारी पुणे महसूल शाखा यांचे कार्यालयाकडील, दि. ३.२.१९८९ चे आदेशानुसार मौजे येडगांव, ता.जुन्नर, जि.पुणे येथील कुकडी प्रकल्पातंर्गत-येडगांव धरणाकरिता संपादित करण्यात आलेल्या परंतु, बुडीत क्षेत्रात न घेतलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करण्यात आल्या आहेत.
(४) होय.
(५) दिनांक १.८.२०१५ चे शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार आवश्यकतेनुरुप लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनीच्या हस्तांतरणादी व्यवहारांवर लादलेले निर्बंध उठविण्याची कार्यवाही प्रकरणरत्वे व अधिनियमित विहित करण्यात आलेल्या पध्दतीनुसार कार्यवाही करणेत येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील उमरोडी प्रकल्पातून नेर तलावात पाणी नेण्याच्या योजनेला मान्यता देण्याबाबत

**(३५) ५०९६२ (३०-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील उमरोडी प्रकल्पातून नेर तलावात पाणी नेणार असल्याचे मा. पालकमंत्री यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जाहीर केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :** (१) नाही.

तथापी, बांधकामाधीन असलेल्या जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेतून नेर तलावात पाणी नेणेबाबत व सभोवतालचे समाविष्ट नसलेलया क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देण्याबाबत मा.पालकमंत्री यांचे समवेत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत चर्चा झाली आहे.

(२) जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीत असून सन २०१६-१७ साठी रुपये ३० कोटी निधीची तरतूद करणेत आली आहे.

मात्र वाढीव क्षेत्रासाठी सद्या वाढीव पाणी उपलब्ध नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ग्रामविकास विभागामार्फत "स्मार्ट ग्राम" योजना राबविण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३६) ५०९७३ (०३-०५-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील ग्रामपंचायतीत सुप्रशासन आणि मुलभूत सुविधा, विकास योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी, अपारंपारिक उर्जा, पाणी स्वच्छता आणि आरोग्य यावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी ग्रामविकास विभागाने "स्मार्ट ग्राम" योजनेचा आराखडा तयार करुन सदरच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यासंदर्भात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तयार केलेल्या आराखड्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे, यावर किती खर्च येणार आहे व त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) होय.

(२), (३) व (४) योजनेच्या प्रस्तावाचे प्रारुप मा.मंत्री मंडळापुढे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**अकोला जिल्ह्यातील मुख्यत्वे खारपाण पट्ट्यात मोडत असलेले पूर्णा नदीवरील सर्व बॅरेजचे काम मान्यतेअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ५१०७० (२५-०४-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील मुख्यत्वे खारपाण पट्ट्यात मोडत असलेले पूर्णा नदीवरील सर्व बॅरेजचे काम शासनाच्या दिनांक १५ जुलै, २०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) जिल्ह्यातील खारपाण पट्ट्यात जमिनीत क्षाराचे प्रमाण अधिक असल्याने पारंपारिक उघड्या कालव्या ऐवजी बंद पाईप लाईन द्वारे सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्याचा निर्णय जल नियामक मंडळाने घेतला असून त्याला मंजुरी सुध्दा दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्णा नदीवरील सर्व बॅरेजचे कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करण्याबाबत व उघड्या कालव्या ऐवजी बंद पाईप लाईन द्वारे सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१६) :** (१) नाही.

प्रकल्पांवर परंपरागत प्रवाही कालवे प्रणाली ऐवजी बंद पाईप लाईनद्वारे सिंचन करावयाच्या प्रस्तावासंदर्भात अशा बदलाचे तरतुदीचा समावेश करुन प्रकल्पास सुप्रमा घेणे आवश्यक असल्याचे शासन पत्र दिनांक १५.७.२०१५ मध्ये निर्देशित आहे. मात्र आता शासन निर्णय दिनांक ०९.०६.२०१६ मधील तरतूदीनुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रकल्प अहवालात पारंपारिक कालवा वितरण व्यवस्थेची तरतुद असतांना, केवळ योजनेच्या पुर्ण किंवा काही भागात नलिका वितरण प्रणाली प्रस्तावित करतांना उपरोक्त शासन निर्णयातील काही तरतुदीच्या अधिन राहून, संपूर्ण प्रकल्प अहवालास सुप्रमा घेण्याची गरज नाही.

तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे पत्र दिनांक १३.१०.२०१५ अन्वये सदर बॅरेजेसना प्राधिकरणाने कलम ११ (च) अन्वये दिलेली मान्यता स्थगित करुन सदर मान्यता पुनर्स्थापित होईपर्यंत कोणतेही काम अथवा खर्च न करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार महामंडळाने पत्र दिनांक ०४.०३.२०१६ अन्वये सदर बांधकामे प्राणहाणी, वित्त हाणी व बांधकामास धोका पोहचून शासनाचे आर्थिक नुकसान होणार नाही या दृष्टीने सुरक्षित टप्प्यावर आणून बंद ठेवण्याचे निर्देश क्षेत्रय अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

पुर्णा बॅरेज- (नेरधामणा) घुगशी बॅरेज व उमा बॅरेज यावर परपरागत प्रवाही कालवे प्रणाली ऐवजी बंद नलिकेद्वारे सिंचन करण्याचे प्रस्तावास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने मान्यता दिली असून काटेपूर्णा बॅरेज बाबत निर्णय व्हावयाचा आहे. तथापि शासन निर्णय दिनांक ०९.०६.२०१६ मधील तरतुदीनुसार आता सदर बॅरेजेसवर नलिका वितरण प्रणालीची कामे हाती घेता येतील.
(३) आता शासन निर्णय दिनांक ०९.६.२०१६ मधील तरतुदीनुसार नलिका वितरण प्रणाली प्रस्तावित करतांना संपूर्ण प्रकल्प अहवालास सुप्रमा घेण्याची गरज नाही. त्यामूळे सदर बॅरेजचे नलिका वितरण प्रणालीचे संकल्पन प्राप्त करुन नलिका वितरण प्रणालीची कामे हाती घेता येतील. प्रकल्पांच्या सुप्रमा प्रस्तावात नलिका वितरण प्रणालीच्या तरतुदींचा समावेश करुन, सुप्रमा प्रस्तावास महामंडळाच्या नियामक मंडळाची प्रचलीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मान्यता घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

## सांगली जिल्हयात वाळवा पंचायत समिती व जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या शिलाईयंत्र खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(३८) ५१०७१ (३०-०४-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात महिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून वाळवा पंचायत समितीने खरेदी केलेल्या आणि जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या शिलाई मशिन्स एकाच कंपनीच्या असताना दोघांच्या खरेदी दरात प्रत्येकी २ हजार रुपयांचा फरक असल्याचे व परिणामी या खरेदी व्यवहारात संबंधितांनी जवळपास १४ लाखांचा अपहार केला असल्याची तसेच जिल्हा परिषदेत ४ शिक्षकांच्या करण्यात आलेल्या बदल्यांमध्येही आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

श्री. रणधीर नाईक, जिल्हा परिषद, सदस्य यांनी दिनांक १२.२.२०१६ रोजीच्या स्थायी समितीत तक्रार उपस्थित केली आहे. तसेच ग्रामविकास विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५४/योजना-४ यांचे दिनोक ०५ एप्रिल, २०१६ च्या आदेशान्वये उपायुक्त विकास व सहाय्यक आयुक्त चौकशी विभागीय आयुक्त, पुणे यांची समिती गठीत करण्यात आली असून, प्रस्तुत प्रकरणात चौकशी सदर समितीमार्फत चालू आहे. अहवाल अद्याप अप्राप्त आहे. तसेच प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगलीकडील चार उप शिक्षकांच्या आपसात आंतरजिल्हा बदली करण्यात आली असून सदर बदली संबंधीतच्या विनंती अर्जानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने केली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील बेरोजगार मजूरांना रोजगार देण्याबाबत

**(३९) ५१८४३ (०६-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पानचिंचोली (ता.निलंगा, जि.लातूर) येथे मजुरांची बेरोजगारीमुळे उपासमार होत असल्यामुळे या त्रासाला कंटाळून मजुरांनी काम मागणीसाठी दिनांक १ डिसेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास सामुहिक आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-०९-२०१६) :** (१) नाही. सदर प्रकरणी काम मिळणेबाबत व काम न मिळाल्यास उपोषण करणेबाबतची निवेदने तहसील कार्यालय, निलंगा येथे प्राप्त झाली होती. यासंदर्भात दि. ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी संबंधित मजुरांनी आंदोलन केले होते.

(२) व (३) सहायक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा व नायब तहसीलदार, निलंगा यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. कृषि आधारित व वन विभागची कामे देण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी त्यावेळी केली. त्यानुसार तालुका कृषि अधिकारी व वन अधिकारी यांन कामे उपलब्ध करुन देण्याबाबत निदेश देण्यात आले होते. सद्य:स्थितीत मौजे पानचिंचोली ता.निलंगा येथे एकूण २३ सिंचन विहिरींची कामे सुरु आहेत. तसेच १९ सिंचन विहिरी व ४२ शोषखड्ड्याची अशी एकूण ६१ कामे शेल्फवर असून, मजुरांच्या मागणीनुसार काम उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यात लहान मोठ्या बंधाऱ्यांची बांधणी करून सिंचन व्यवस्था उभी करण्याबाबत**

**(४०) ५१९२२ (०६-०५-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात वैनगंगा, कठाणी, खोब्रागडी प्राणहिता, इंद्रावती, पामुलागौतम, यासारख्या मोठ्या नद्यांसह अनेक लहान -मोठ्या नद्या व नाले मोठ्या प्रमाणावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात या नद्याना पूर येतो व पाणी वाहून जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यातील पाणी या नद्यांवर बंधारे नसल्यामुळे वाया जाते व त्याचा उपयोग येथील शेतींना होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नदी-नाल्यांवर बंधारे बांधून पाण्याची साठवणूक केल्यास पाण्याचा सदुपयोग करता येईल, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) वैनगंगा नदीवर ५ बंधाऱ्याची श्रृंखला निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापैकी चिचडोह बंधाऱ्याचे काम प्रगतीत आहे. या बंधाऱ्याचे पाणीसाठ्यावर उपसा सिंचन योजनाही प्रस्तावित आहेत. त्याव्दारे गडचिरोली जिल्ह्यांतील २५७०९ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सातारा जिल्ह्यातील जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेमधून वगळण्यात आलेल्या नेर तलावावरील गावांना योजनेत सामावून घेण्याबाबत

**(४१) ५२०९६ (२५-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेमधून वगळण्यात आलेल्या नेर तलावावरील गावांना या योजनेतून वगळण्यात आले होते, या गावांचा योजनेत समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या जिल्ह्याचे मा.जलसंपदा, मंत्री यांनी याबाबत उच्चपदस्थ अभियंत्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.जलसंपदा, मंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर गावांना या योजनेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांच्या दि. ५.१.२०१६ चे बैठकीत नेर तलावावरील ८५० मी. तलावांवरील क्षेत्राचे सर्वेक्षण करणेच्या सूचना दिलेल्या आहेत.

(२) क्षेत्रिय स्तरावर प्राथमिक सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यांतील पाझर तलाव सुरु करण्याबाबत

**(४२) ५२५५६ (०३-०५-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील (१) भेंडवळ (२) भोरमाळ (३) पंगारबारी व इतर ३ हे पाझर तलाव सन १९८५ सालापासून वन खात्याच्या हरकतीमुळे बंद पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाझर तलावांचे किती काम पूर्ण झाले आहे व सदर तलावांचे त्या वेळचे अंदाज पत्रकीय रक्कम प्रत्येकी किती होती,

(३) असल्यास, सन १९८५ पासून पाझर तलाव सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (१८-०७-२०१६) :** (१) होय.

(२) पाझर तलावांचे बाजु भरावाचे ५०% काम रोजगार हमी योजनेतून झालेले आहे त्या वेळचे अंदाजपत्रकांची किंमत खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | पा.त.भेंडवळ | ६.९१ |
| २ | पात.भोरमाळ | ६.४५ |
| ३ | पा.त.पांगारबारी | ५.८९ |
| ४ | पा.त.गळवट | ६.७९ |
| ५ | पा.त.वरंभे | ७.६९ |
| ६ | पा.त.काकडदरी | ७.५९ |

(३) सदर योजना रोहयो अंतर्गत मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या दिनांक २१/०५/२०१२ च्या पत्रान्वये सदर योजना रोहयोतून वगळण्यात आलेल्या असल्याने सदर योजना शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून पूर्ण करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रके जलसंपदा विभागाच्या सन २०११-१२ चे दरसुची नुसार सुधारित करुन सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक यांनी सादर केले होते. दरम्यान जलसंपदा विभागाची सन २०१३-१४ ची दरसूची प्राप्त झाल्याने तसेच गौणखनिजाचे दरही रु.७०.६७/ घ.मी. ऐवजी रु.१४१.३४/ घ.मी. झाल्यामुळे अंदाजपत्रके अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक यांच्याकडे परत करण्यात आले असून त्याप्रमाणे अंदाजपत्रके सुधारित करण्याचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केळवणे (ता.पनवेल, जि.रायगड) व पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) येथील खाडीची बांधबंधीस्ती फुटल्यामुळे शेत जमीन नापीक झाल्याबाबत**

**(४३) ५३७११ (२४-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केळवणे (ता.पनवेल, जि.रायगड) व पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) येथील खाडीची बांधबंधीस्ती फुटल्यामुळे हजारो एकर शेत जमीन नापीक झाली असून शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यामुळे फुटलेले बांध बुजवूनसुद्धा भरतीचे पाणी शेतामध्ये जाऊन शेती नापीक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील पर्यावरण विभागाची मंजुरी न मिळाल्यामुळे सदर खाडीची बांधबंधीस्तीसाठी जेएनपीटी, ओएनजीसी आणि सिडकोकडून मिळणारा प्रत्येकी ५ कोटी रुपये सीएसआर फंड अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी फुटलेले बांध बुजवून कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०९-२०१६) :** (१) होय.
(२) केळवणे व पुनाडे या खाजगी खारभूमी योजना असून सदर योजनांची देखभाल व दुरुस्ती संबंधित लाभधारक करीत आहेत.
(३) नाही.
(४) खाजगी खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेबाबत**

**(४४) ५३९७७ (२४-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे पाठपुरावा करेल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये कोकणाकरिता स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याची विनंती मा.केंद्रीय गृह मंत्री यांना केली आहे.

---

**गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याबाबत**

**(४५) ५४५८८ (२४-०८-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी शासनाने दिनांक १२ एप्रिल २०१६ रोजी वा त्यासुमारास तज्ञ समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याचा तज्ञ समितीचा अहवाल शासनास सादर झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालानुसार गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :** (१) होय,
दि.१२ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णय क्र. मजनिप्रा-२०१५/३९१/प्र.क्र.९३/२०१५/जसं (आस्था) अन्वये गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याच्या दृष्टीने तज्ञ समिती स्थापन करण्यात आली आहे.
(२) नाही.
(३) गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी तज्ञ समितीची पहिली बैठक दि.२७ मे, २०१६, दुसरी बैठक दि. १६ जुलै, २०१६ व तिसरी बैठक दि. ६ ऑगस्ट, २०१६ रोजी संपन्न झाल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत निधीतील प्रस्तावित अनेक कामांना प्रशासकीय मान्यता विलंबाने मिळाल्याने निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(४६) ५५४७४ (२६-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हा वार्षिक योजना कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत (डी.पी.डी.सी.निधी) निधीतील प्रस्तावित अनेक कामांना जिल्हाधिकारी लातूर यांनी विलंबाने प्रशासकीय मान्यता दिल्यानेच सदर योजनेंतर्गत प्राप्त निधी हा कामे वेळेत पूर्ण होऊ न शकल्याने अखर्चित राहिला व सदर प्राप्त निधी परत करावा लागला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार किती कामे अपूर्ण असून किती निधी शासनास परत करावा लागलेला आहे,
(४) असल्यास, सदर निधीतील कामे वेळेत पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही. लातूर जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१५-१६ साठी रु.१४५.०० कोटी इतका नियतव्यय मंजूर आहे. जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार सदर नियतव्यय मर्यादेतील सर्व अनुज्ञेय कामांना १०० टक्के प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच वितरीत निधीपैकी काही जिल्हा योजनांमध्ये बचत होणार असल्याचे कार्यान्वयीन यंत्रणांनी कळविलल्यामुळे रु. १०१३.९४ लक्ष इतकी बचत "मुख्यमंत्री ग्राम सहड योजना" या योजनेस पुनर्विनियोजनाने वर्ग करण्यात आली.

त्यानंतर काही यंत्रणांनी काही योजनांमध्ये पुन्हा बचत होत असल्याचे आर्थिक वर्षाच्या शेवटी ऐनवेळी कळविल्यामुळे उपलब्ध होत असलेली रु. ८८.४४ लक्ष बचत “मुख्यमंत्री ग्राम सडक योजना” या योजनेसाठी पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही दि. ३१ मार्च, २०१६ रोजी करीत असताना बी.डी.एस. प्रणाली बंद पडल्याने सदर योजनेसाठी निधी वर्ग होऊ शकला नाही व तो व्यपगत झाला.
(३) ते (५) सन २०१५-१६ मध्ये मंजूर करण्यात आलेली कामे प्रगतीपथावर असून निधी शासनास परत करण्यात आलेला नाही. तसेच कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

---

**आमदारांच्या स्थानिक विकास निधीत केलेल्या बदलाबाबत**

**(४७) ५५८२७ (२३-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमदारांच्या स्थानिक विकास निधीतील कामांमध्ये बदल करण्यात येणार असल्याचे शासनाने निर्णय घेतल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आमदारांच्या स्थानिक विकास निधीतील करण्यात येणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, शासनाने आमदारांच्या स्थानिक विकास निधीत केलेल्या बदलाचा संपूर्ण तपशील काय आहे,
(४) सदर निर्णयावर कोणतीही अंमलबजावणी केली नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१०-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) होय. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या कामांसाठी सुधारित सर्व समावेशक मार्गदर्शक तत्वे शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दि.१२.७.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आली आहेत. त्यामध्ये मार्गदर्शक सूचनांमध्ये केलेल्या बदलांची तपशीलवार माहिती देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ आणि मराठवाड्यात मूल्यवर्धित करात संर्पूण सूट देण्याच्या धोरणाबाबत**

**(४८) ५८१९७ (११-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ आणि मराठवाड्यात उद्योगांसाठी मूल्यवर्धित करात संर्पूण सूट देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणामुळे मूल्यवर्धित कराच्या महसुलामध्ये किती तूट अपेक्षित आहे व ही तूट भरुन काढण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१०-२०१६) :** (१) नाही.
(२) लागू नाही.
(३) लागू नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील १४६ गावे महाराष्ट्र ग्रामीण बँके ऐवजी इतर राष्ट्रीयीकृत बँकेस जोडण्याबाबत

**(४९) ५९३७९ (२६-०८-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ३६ शाखा असून १४६ गावे या शाखांकडे आर्थिक व्यवहारासाठी दत्तक देण्यात आलेली असून या बँकेकडे कमी प्रमाणात ठेव उपलब्ध असल्याने ही बँक कर्ज देवू शकत नाही म्हणून दुष्काळासारख्या आणीबाणीच्या काळात जनतेला योग्य सहकार्य मिळण्याच्या अनुषंगाने १४६ गावे महाराष्ट्र ग्रामीण बँके ऐवजी राष्ट्रीयीकृत बँकेस जोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी पाठपुरावा करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यात तीव्र दुष्काळी परिस्थिती असल्याने कर्जाची व खास करून शैक्षणिक कर्जाची मागणी शेतकऱ्यांकडून तसेच विद्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १४६ गावे महाराष्ट्र ग्रामीण बँके ऐवजी इतर राष्ट्रीयीकृत बँकेस जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-१०-२०१६) :** (१) उस्मानाबाद जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ३६ शाखा आहेत. या बँकेच्या अध्यक्षांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे दि.१५.०६.२०१६ रोजी पत्राद्वारे असे सूचित केले होते की, बँकेच्या सर्व शाखा पीक कर्ज वाटप व पुनर्गठनास प्राधान्य देतील.
(२) दि. २२.६.२०१६ रोजी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या प्रबंधकांनी जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे बँकेच्या २८७ पैकी १६१ दत्तक गावांना इतर राष्ट्रीयीकृत बँकेस कर्ज वाटपासाठी (पीक कर्ज, कृषी कर्ज व शासकीय योजना) दत्तक देण्याची विनंती केली आहे.
(३) सदर विनंती अर्ज जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद येथे आल्यानंतर तो १ जुलै, २०१६ रोजी उप महाव्यवस्थापक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (एसएलबीसी) पुणे व क्षेत्रीय

व्यवस्थापक, भारतीय रिजर्व बॅंक, मुंबई यांना योग्य त्या मार्गदर्शनासाठी व निर्णयासाठी अग्रेषित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये १० वी पंचवार्षिक योजना बंद करुन वार्षिक योजना अंमलात आणल्याबाबत**

**(५०) ५९५५२ (२४-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये १० वी पंचवार्षिक योजना माहे मार्च, २००७ रोजी संपल्याने सन २००७ ते १२ हा अकराव्या योजनेचा कालावधी होता मात्र (वर्ष २०१२-१७) ही १२ वी पंचवार्षिक योजनादेखील शासनाने सुरु केलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचवार्षिक योजना बंद करुन वार्षिक योजना अंमलात आणण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पंचवार्षिक योजना बंद करुन अंमलात आणलेल्या वार्षिक योजनेद्वारे आतापर्यंत किती टक्के विकास दर वाढला आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
राष्ट्रीय विकास परिषदेच्या दि.२९/०५/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत राज्याची १२ वी पंचवार्षिक योजना मांडण्यात आली. १२ व्या पंचवार्षिक योजनेचे आकारमान रु.२,७५,०००/- कोटी इतके ठरविण्यात आले. पंचवार्षिक योजनेमध्ये ठरविण्यात आलेल्या ध्येय व धोरणांची अंमलबजावणी वार्षिक योजनांच्या माध्यमातून करण्यात येते.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.